**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ३६ दिनांक २२/०७/२०२४**

# अवैधरित्या अंमली पदार्थाची वाहतुक करणाऱ्या दोन आरोपींवर जव्हार पोलीस ठाणे यांचेकडून कारवाई

श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेसाठी तसेच अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलीस ठाणे हद्दित प्रभावी गस्त घालणे तसेच नाकाबंदी लावणेबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सुचना व आदेश दिलेले आहेत.

त्याअनुषंगाने दिनांक २०/०७/२०२४ रोजी १८.०० वाजताचे दरम्याण जव्हार पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. संजयकुमार ब्राम्हणे व सोबत पोलीस उप निरीक्षक/अनिल दिघोळे, पोहवा/गायकवाड, पोहवा/विटकर, वाहतुक शाखेचे सहा.फौ/सालकर व पोना/भोगाडे असे डहाणु नाका येथे नाकाबंदी करीत असतांना १८.४० वा.चे सुमारास नाशिक बाजुकडुन मनोरकडे जाणारी पांढऱ्या रंगाची एक महिंद्रा पिकअप गाडी क्र. MP.46.G.2249 ही डहाणु नाका येथे आली. सदरची पिकअप गाडी संशयीत वाटल्याने वाहतुक शाखेचे सहा.फौ/सालकर यांना सदर गाडी थांबविण्यास सांगितले. सादर गाडी थांबवुन चेक केले असता पिकअप मध्ये रिकामे भाजीपाल्याची प्लास्टीकचे कॅरेट दिसुन आले. सदर कॅरेटमध्ये चेक केले असता त्यातील खालील बाजुस असलेल्या एकुण सहा कॅरेटमध्ये प्लास्टीकमध्ये गुंडाळलेले गाठोडे दिसुन आले. ते गाठोडे उघडुन बघितले असता त्यामध्ये उग्र वास येत असलेला हिरवट व काळपट रंगाचे पानाचा वड्या केलेल्या व सफेद रंगाच्या कॅनबिज बिया असलेला गांजा सदृश्य अंमली गुंगीकारक पदार्थ असल्याचे खात्री झाली. नमुद महिंद्रा पिकअप गाडी क्र. MP. 46. G. 2249 चे चालक व क्लिनर यांच्याकडे सखोल चौकशी केली असता पिकअप चालक याने त्याचे नाव १) सुनिल तुकाराम आर्य, वय २४ वर्षे, रा. तांडा फलीया जोगवाडा, ता. निवाली जि. बडवाणी राज्य मध्यप्रदेश व क्लिनर याने त्याचे नाव- २) श्रीराम दिनेश सोलंकी, वय २१ वर्षे, रा. पटेल फलीया जोगवाडा, ता. निवाली जि. बडवाणी राज्य मध्यप्रदेश असे सांगितले.

वरील इसमांकडुन खालील वर्णनाचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.
सहा कॅरेटमध्ये एकुण ३१ किलो ८९८ ग्रॅम वजानाचे ७,९७,४५०/- रु. किंमतीचा गांजासदृश्य अंमली पदार्थ.

३,५०,०००/- रुपये किंमतीची महिंद्रा पिकअप गाडी क्र. MP. ४६. क्र २२४९
असा एकुण ११,५०,४५०/- रुपये एकुण किंमताचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदर बाबत जव्हार पोलीस ठाणे येथे वरील इसमांचे विरुध्द गुरनं ।। १६९/२०२४ गुंगीकारक औषधीद्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हा पोउनि/अनिल दिघोळे नेमणुक जव्हार पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री.बाळासाहेब पाटील पोलीस अधिक्षक पालघर, श्री.पंकज शिरसाट अपर पोलीस अधिक्षक पालघर, श्री.गणपत पिंगळे उपविभागीय पोलीस अधिकारी जव्हार विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि/संजयकुमार ब्राम्हणे, प्रभारी अधिकारी, जव्हार पोलीस ठाणे, पोउनि/अनिल दिघोळे, पोहवा/नंदकुमार गायकवाड, पोहवा/प्रदिप विटकर, पोना/सोपान भोगाडे सर्व नेमणुक जव्हार पोलीस ठाणे तसेच वाहतुक शाखेचे सहा.फौ/चंद्रकांत सालकर यांनी उत्कृष्टरित्या केलेली आहे.